महाराष्ट्र शासन
GRANT GOVT. MEDICAL COLLEGE &
+ SIR J.J.GROUP OF HOSPITALS, MUMBAI +
(GOVERNMENT OF MAHARASHTRA)
ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समुह रुग्णालये, मुंबई - ४००००८
Tel.No.373 55 55, 373 1144 ; Fax No.373 55 99; e-mail – gmcgss3@gmail.com

क्र.गॅशावैम/राजप/जाहिरात/कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक/३६६८/२०२६ दिनांक १६/८/२०२६

**कार्यालयीन आदेश**

विषय - सहाय्यक प्राध्यापक पदावर ३६४ दिवसांकरिता तात्पुरत्या स्वरुपाची नियुक्ती देण्याबाबत...

संदर्भ - १) शासन निर्णय क्र.वेतनी-२०१९/प्र.क्र.०३/२०१९ वैसेवा-२, दिनांक ३१/१२/२०२०.

२) या कार्यालयाचे जा.क्र. ग्रॅशावैम/राजप/सहा.प्राध्या./जाहीरात/३११०/२०२६ दिनांक ०७.०८.२०२६

३) या कार्यालयाचे जा.क्र. ग्रॅशावैम/राजप/सहाय्यक प्राध्यापक/मुलाखत/३४२४/२०२६ दिनांक ०३.०९.२०२६.

ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई या संस्थेच्या आस्थापनेवर रिक्त असलेली सहाय्यक प्राध्यापकांची पदे कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांकरीता भरण्याकरिता या संस्थेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करून उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ०४.०९.२०२६ रोजी ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मुंबई, तिसरा मजला प्रशासकीय भवन येथे घेण्यात आल्या. तरी सदरील मुखाखततीमध्ये पात्र उमेदवारांची नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधनि राहून तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांकरिता नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अध्यापकांची नावे | विभाग | पासून | पर्यत |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.तनय शिरीष धानोरकर | शल्यचिकित्साशास्त्र | दिनांक १६.०९.२०२६ | दिनांक १४.०९.२०२७ |
| २ | डॉ.राहुल अशोक मिश्रा | शल्यचिकित्साशास्त्र | दिनांक १६.०९.२०२६ | दिनांक १४.०९.२०२७ |
| ३ | डॉ.नेहा बाबासाहेब देसाई | विकृतीशास्त्र | दिनांक १६.०९.२०२६ | दिनांक १४.०९.२०२७ |
| ४ | डॉ.अन्शीदा के. | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र | दिनांक १६.०९.२०२६ | दिनांक १४.०९.२०२७ |
| ५ | डॉ.अनेरी केवल शाह | क्ष-किरणशास्त्र | दिनांक १६.०९.२०२६ | दिनांक १४.०९.२०२७ |
| ६ | डॉ.सागरीका दत्तात्रय ढवण | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | दिनांक १६.०९.२०२६ | दिनांक १४.०९.२०२७ |
| ७ | डॉ.चौधरी एमडी फय्याझ एमडी इल्यास | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | दिनांक १६.०९.२०२६ | दिनांक १४.०९.२०२७ |

अटी व शर्ती

१. सदरील निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील ३६४ दिवसांकरिता कंत्राटी स्वरुपाची नियुक्ती महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत/नियमित सहाय्यक प्राध्यापक उपलब्ध होईपर्यत किंवा बदलीने नियमित सहाय्यक प्राध्यापक उपलब्ध होईपर्यन्त किंवा संचानालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून बंधपत्रित सहाय्यक प्राध्यापक उपलब्ध होईपर्यन्त यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यत निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यांत येत आहे.

२) सदरील उमेदवारांचा तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर त्यांची सेवा आपोआप संपुष्टात होईल. त्याकरीता सेवा समाप्तीचे वेगळे आदेश निर्गमित केले जाणार नाहीत. दरम्यानच्या काळात त्यांना सहाय्यक प्राध्यापक पदाचा स्वेच्छेने राजीनामा दयावयाच्या असल्यास/ सेवा सोडून जावयाचे असल्यास एक महिन्याची पुर्व सुचना द्यावी लागेल अथवा आगाऊ सूचना न दिल्यास एक महिन्याचे ठोक मानधन रुपये एक लाख शासनास अदा करावे लागेल.

३) सदरील उमेदवारां विरुध्द कोणतीही तक्रार वा त्यांच्या कामकाजात अनियमितता आढळून आल्यास त्यांना दिलेली सदरील कंत्राटी नियुक्ती कोणतीही चौकशी सुरु न करता अथवा पूर्व सूचना न देता तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

४) सदरील नियुक्तीचा कालावधी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांकरीता असून, त्याकरीता संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयानुसार नियमित वेतनश्रेणी ऐवजी रुपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) इतके ठोक मानधन अनुज्ञेय राहील.

५) उमेदवारांनी विहित दिनांकापासून तात्काळ कर्तव्यावर रुजू व्हावे अन्यथा त्यांची सहाय्यक प्राध्यापक पदावरील तात्पुरती नियुक्ती रद्द करण्यात येईल. त्यांनी सहाय्यक प्राध्यापक पदाचा कार्यभार विभाग प्रमुखाकडुन स्विकारुन रुजूता अहवाल या कार्यालयास ०७ दिवसांच्या आत सादर करावा. तसेच नवीन उमेदवारांनी १५ दिवसांच्या आत चारित्र्य पडताळणी फॉर्म ०२ प्रतीत भरुन या कार्यालयास सादर करावा. तसेच वैद्यकीय तपासणी करिता अध्यक्ष, स्थायी वैद्यकीय मंडळ, सर, ज.जी. समूह रुग्णालय, मुंबई यांच्या समोर उपस्थित राहून वैद्यकीय तपासणी करावी व पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. तथापि वैद्यकीय तपासणीचा अहवाल व चारित्र्य पडताळणी सादर न केल्यास अनुभव प्रमाण पत्र देणे शक्य होणार नाही.

६) तसेच पुढील नियुक्ती स्विकारण्यास इच्छुक असल्याबाबतचा विनंती अर्ज व सर्व कागदपत्र

(अ) प्रथम द्वितीय व तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. तसेच एम.डी., एम.एस.,डी.एम., एमसी.एच. किंवा समतुल्य या सर्व परीक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे गुणपत्रिका नसल्यास परीक्षा पॉईट, ग्रेड प्रमाणपत्र.

(ब) सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रिका

(क) एम.एम.सी किंवा एम.सी.आय. नुतनीकरण केलेले नोंदणी प्रमाणपत्र.

(ड) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र.

(ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला

(फ) एक वर्ष सिनियर रेसिडेंट पदाचे अनुभव प्रमाणपत्र

(ग) पॅनकार्ड व आधारकार्डची छायाप्रत इत्यादी कागदपत्रे / प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. नियुक्ती संपण्यापूर्वी १ ते २ महिन्याआधी प्राध्यापक व विभाग प्रमुख यांचे मार्फत या कार्यालयास सादर करावा.

७) सहाय्यक प्राध्यापकांनी (प्रशासकीय भवन तिसरा मजला) येथे बायोमेट्रिक रजिस्ट्रेशन करुन दर महिन्याचा उपस्थिती अहवाल प्राध्यापक व विभागप्रमुख यांच्यामार्फत या कार्यालयास सादर करावा. बायोमेट्रिक उपस्थिती अहवाल सादर न केल्यास पुढिल नियुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत.

८) वयोमर्यादा :- सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराचे वय ४० वर्षापेक्षा अधिक असणार नाही व मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

९) ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असताना सतत जास्त कालावधी पर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

१०) उमेदवाराची निवड करताना तसेच ज्या उमेदवारांना बंधपत्रित कालावधी पूर्ण करावयाचा आहे त्यांना प्राधान्य देण्यात येईल. तद्नंतर ज्या उमेदवारांनी या संस्थेतून/शासकीय/निमशासकीय संस्थेतून बंधपत्रित सेवा (पीजी बॉन्ड) पूर्ण केली आहे, अशा उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

११) निवड झालेल्या उमेदवारास ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कोणत्याही संलग्न रुग्णालयात नेमणूक केली जाईल जसे सर ज.जी. समूह रुग्णालय, सेंट जॉर्जेस रुग्णालय, मुंबई किंवा नागरी स्वास्थ्य केंद्र, वांद्रे यापैकी कोणत्याही संस्थेत काम करावे लागेल व प्रशासनास आवश्यकता असल्यास यापैकी कोणत्याही रुग्णालयात नेमणुकीत बदल करण्यात येईल.

(डॉ. अजय भंडरवार)
अधिष्ठाता,
ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.

प्रति,

उपरोक्त विषयातील सर्व सहाय्यक प्राध्यापक (३६४ दिवस कंत्राटी),
ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई (मार्फत:- प्राध्यापक व विभाग प्रमुख)

प्रत :-

१) उपरोक्त विषयातील सर्व प्राध्यापक व विभाग प्रमुख, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई (मार्फत वे. देयक लिपिक)
३) वेतन देयक लिपिक, राजपत्रित अधिकारी, लेखा विभाग ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई.
४) मा.आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे माहितीस्तव सविनय सादर.